[redacted]

राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या आस्थापना बाबींविषयक मागविणेत येणाऱ्या मार्गदर्शनाच्या कार्यपध्दतीबाबत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
परिपत्रक क्रमांक :- नपप्रस/२०२१/सर्व न.प/आस्थापना सेवा विषयक बाबी/प्र.क्र. ४५/कक्ष-४ / 2६8
वरळी, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- 23/05/2022

## परिपत्रक

राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या कर्मचारी आस्थापनाविषयक बाबींबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक व संचालनालयाचे स्थायी निर्देश, परिपत्रक इत्यादीमधील तरतूदीप्रमाणे विहित मुदतीत अंमलबजावणी होणेकरिता सूचना निर्गमित करणेत आल्या आहेत.

**०२.** मुख्याधिकारी यांनी आस्थापना बाबींविषयकची प्रकरणे जसे की, आश्वासीत प्रगती योजना, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देणेबाबत, अनुकंपा नियुक्तीबाबत, (संवर्ग व्यतिरिक्त) रोजंदारी कर्मचाऱ्याचे समावेशन, नवीन पेन्शन योजने, सेवानिवृत्ती विषयक सर्व प्रकरणे, नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या (संवर्ग व्यतिरिक्त) जिल्हा व विभाग अंतर्गत बदली तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशन करणे, १९९३ ते २००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांचे समावेशन, अस्थायी पदावरील नियुक्त्याबाबत, निष्कासित पदे पुर्नजिवित करणे, १०.०३.१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून त्यांच्या वारसा हक्कबाबतची प्रकरणे, नगरपरिषद कर्मचारी पदोन्नती व अंतर्गत भरतीची प्रकरणे, वेतनश्रेणीबाबतची प्रकरणे व इतर याबाबींसंदर्भात शासन निर्णय, शासन परिपत्रक, व संचालनालयाचे स्थायी निर्देश, परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून देण्यात आली आहेत.त्यामुळे संबंधित प्राधिकारी यांनी शासन व संचालनालयाचे अद्ययावत आदेशांची दखल घेऊन प्रकरणे त्वरीत निकाली काढणेची स्पष्ट निर्देश देण्यात आली आहेत,असे असताना देखील जिल्हाधिकारी कार्यालय (नगरपरिषद शाखा) व नगरपरिषदा /नगरपंचायतींकडून तसेच विविध संघटनाकडून विहित मार्गाचा अवलंब न करता व अपुर्ण कागदपत्रेसह पूर्वीच्या आणि अद्यावत शासन निर्णयांचा/परिपत्रकांचा/ आदेशांचा संदर्भ न घेता मार्गदर्शनाच्या नावाखाली अनावश्यक पत्रव्यवहाराद्वारे थेट संचालनालयाकडे सादर करणेत येतात.

त्यामुळे काही संदर्भांवर कार्यवाही होणेस विलंब होऊन न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात. अशा मा.न्यायालयीन प्रकरणांमध्ये संबंधित कार्यालयांशी समन्वय साधला जात नाही. तसेच संचालनालयाचा धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणेच्या कामाऐवजी केवळ किरकोळ व वैयक्तिक संदर्भाबाबत बहुमुल्य वेळ व श्रम याचा अपव्यय होत असल्याचे दिसून येते. यामुळे दप्तर दिरंगाई होवून कर्मचाऱ्यांमध्ये वा विविध कर्मचारी संघटनामध्ये असंतोष निर्माण होतो, असे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

**०३.** सबब, याद्वारे आपणास कळविणेत येते की, नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या आस्थापना बाबींविषयक मागविणेत येणाऱ्या मार्गदर्शनाबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करणेत येत आहे.

अ) मुख्याधिकारी यांनी आस्थापना बाबींविषयक ज्या प्रकरणांमध्ये धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे केवळ अशीच प्रकरणे वा प्रस्ताव परिपूर्ण छाननी करून सर्व कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयास (नगरपरिषद शाखा) सादर करावा.

ब) जिल्हाधिकारी कार्यालयाने (नगरपरिषद शाखा) संबंधित प्रस्ताव त्यांचे अभिप्रायासह संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (नगरपरिषद शाखा) या कार्यालयास सादर करावा.

क) विभागीय सह आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (नगरपरिषद शाखा) कार्यालयाने सदर प्रस्तावाची छाननी करून धोरणात्मक निर्णय होण्याची आवश्यकता असल्यास स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आणि योग्य त्या शिफारशीसह परिपूर्ण प्रस्ताव संचालनालयास सादर करावा.

ड) नगरपरिषदेने कोणताही प्रस्ताव उपरोक्त नमूद विहित मार्गानेच पाठविणेची दक्षता घ्यावी.

ई) शासन / संचालनालयाकडून अद्यावत सूचना प्राप्त असलेल्या आस्थापनाविषयक बाबींबाबत मार्गदर्शन मिळणेकरिता अनावश्यक थेट पत्रव्यवहार करू नये.

०४. जिल्हाधिकारी कार्यालय (नगरपरिषद प्रशासन) व मुख्याधिकारी यांनी उक्त कार्यपध्दतीचा अवलंब न केल्याचे निदर्शनास आल्यास किंवा थेट संचालनालयास संदर्भ केल्यास संबंधित संदर्भाची दखल घेतली जाणार नाही. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ.किरण कुलकर्णी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,

प्रति,

१. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कोकण, नाशिक,पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
२. सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय(सर्व )
३. मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत (सर्व )
४. निवड नस्ती